शब्दसृजा

संहिता हिस्वनकर

ई साहित्य प्रतिष्ठान

शब्दसृजा (कवितासंग्रह)

कवयित्री : संहिता हिस्वनकर
पत्ता : बीड बायपास, औरंगाबाद
ईमेल : Samhita.hiswankar@gmail.com
मोबाईल : ७५८८३९९३९९
ब्लॉग : thesamhita.blogspot.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवयित्रीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कवयित्रीची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान
www. esahity. com
esahity@gmail. com
प्रकाशन :१ नोव्हेंबर २०१६(भाऊबीज)
©esahity Pratishthan®2016

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

अर्पणपत्रिका

अमावास्येच्या रात्री जे दिवा झाले

धुलवडीच्या दिवशी जे उधळण झाले

कुळाचाराच्या दिवशी जे जयघोष झाले

श्राद्धाच्या दिवशी जे शांतता झाले

आल्या-गेल्या दिवशी जे प्राक्तन झाले

संकटाच्या दिवशी जे मित्र झाले

आणि आजच्या दिवशी जे आशीर्वाद झालेत

त्या शब्दांना अर्पण..



मनोगत

आजच्या आधी करोडो लोकांनी अब्जावधी शब्द मराठी भाषेत बोलले असतील. लहानपणी पहिला शब्द ‘आई’ बोलण्यापासून ते आजच्या प्रत्येक वादात शेवटचा शब्द ठेवण्यापर्यंतचा हा शब्दांचा प्रवास रोमांचक आहे, शब्द आपल्या हातात असलेली जादूची कांडी आहेत. मनातल्या भावनेला नुसती वाटच नाही तर चांगले राजमार्ग करून देणारी ती शक्ती म्हणजे माझे शब्द. आणि सृजा त्यांची आजन्म ऋणी आहे.

शब्दांची कविता बनली ती माझ्या रक्तातच. शुद्ध आणि स्पष्ट भाषेचे संस्कार, उदंड वाचन आणि त्यांच्याच शब्दसमृद्धीचा वारसा मला जन्मतःच गिरीश-सीमा हिस्वनकर म्हणजेच आई-नानांकडून आला आहे. वयाच्या दहाव्या वर्षापासून ते आजवर म्हणजे गेली तब्बल पंधरा वर्ष त्यांनी दिलेली कविता माझी शक्ती बनून माझ्यासोबत चालते आहे. शब्दांनी बनलेली ही कविता कधी माझी उशी झाली तर कधी काठी. कधी मार्ग झाली तर कधी लक्ष्य. कधी प्रश्न झाली तर कधी उत्तरांची साखळी. माझी कविता नेहमीच माझी पांथस्थ बनून राहिली आहे आणि ती सरस्वतीच्या कृपेने तशीच राहो. सृजा त्या जन्मदात्यांची आणि या कवितेची विनम्र सखी आहे.

मला कविता करता येतात हा शोध खूप आधीच लागला असला तरीही कविता दुसऱ्या व्यक्तीसमोर मांडताही येते हा साक्षात्कार दिला दहावीत असताना orkut च्या ‘मराठी कविता’ कम्युनिटीने. ती माती घेऊन माझी कविता रुजली, बहरली आणि विहारली. त्या कम्युनिटीवर भेटलेले आणि वेड्या संहिताला छकुली म्हणून आपलं बनवणारे आणि तिच्या कवितेला खत-पाणी देणारे अवलिये म्हणजे नाम गुम जायेगा, प्रभा प्रभुदेसाई, सुधीर मुळीक आणि सनिल पांगे यांच्याशिवाय ही सृजा असणं शक्य नाही.

पोटापाण्याच्या शोधात देशाटन, पंडित मैत्री आणि सभांमध्ये संचार करत असताना कविता एखाद्या जुन्या जीन्सच्या मागच्या खिशात ठेवलेल्या नोटेसारखी जराशी विस्मरणात जाते खरी. पण माझ्या आयुष्यातली एक गोष्ट मला नेहमीच ती नोट परत मिळाल्याचा आनंद देते. आणि ती गोष्ट आहे ई-साहित्य प्रतिष्ठान. ई-साहित्यने मला आणि मला काय दिलंय हे शब्दात सांगणं अशक्य आहे. त्या संस्थेच्या आणि संस्थाचालकांच्या खांद्याला खांदा देऊन सृजा सदैव उभी आहे.

घर, orkut आणि ई-साहित्य परिवाराच्या बाहेर सृजा फारशी कुणाला माहीत नाही. पण संहिताचं एक अस्तित्व तर आहेच. आणि त्या संहितेला सृजा बनण्यासाठी प्रोत्साहित करणाऱ्या काही व्यक्तींची नावं इथे येणं आवश्यक आहे. माझ्या आयुष्याचे हे वेळोवेळी येणारे ‘लोड बेअरिंग पिलर्स’ म्हणजे नानू (आर्शिया), अदिती, निखील आणि रंजन. त्यांच्याशिवाय संहिता असू शकत नाही.

या सगळ्यांसोबतच तुम्ही, माझे वाचक. तुमच्यासमोर शब्दासृजा ठेवताना आनंद होत आहे.

कोण आहे ही सृजा/संहिता?

छायाचित्रकार : स्वर्णावो दत्ता, अमनजोत कौर.

संहिता हिस्वनकर. बी.टेक.

व्यवसायाने, वृत्तीने आणि बुद्धीने इंजिनियर.

मनाने विचारशील व्यक्तिमत्व.

आवाजाने एक सततची वक्ती

वाटांनी एक निरंतर प्रवासी.

नात्यांनी एक मुलगी, बहिण आणि तुम्हाला भेटेल अशी जगातली सगळ्यात चांगली मैत्रीण.

आणि

शब्दांनी कधी कधी कवयित्री.

पत्ता : बीड बायपास, औरंगाबाद.

ईमेल : Samhita.hiswankar@gmail.com

मोबाईल : ७५८८३९९३९९

ब्लॉग : thesamhita.blogspot.com

शब्दसृजा संहिता हिस्वनकर

चला भरारी घेऊया!

ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

मला देव शब्दातच दिसला

काहींनी तो मूर्तीत पाहिला

काही म्हणाले तो तर परमात्मा..

काहींच्या मात्यापित्यात त्याची छाया-

काहींना तो स्वतःतच भासला.

मी मात्र वेगळी असावी..

कारण,

मला देव शब्दांतच दिसला.

स्वतःवरचा जगावरचा विश्वास जेव्हा उडून जातो

अशा काही ओळी वाचल्या होत्या

काही अक्षरे जोडली होती

काही छंद जमवले होते

पूजा स्वरांनी केली जेव्हा

आत्माही त्यात मी ओतला..

कारण,

मला देव शब्दांतच दिसला.

माऊलीची कूस असो की देवळाची पायरी

सुखाचं सिंहासन की ओसाड ओसरी

शिखरी उन्मादांच्या आणि निराश गर्तेत

कण कण जमवलेल्या यशाच्या वार्तेत.

प्रत्येकच ठिकाणी मी शोधली वर्णने

आणि त्यांना ओलावा बांधला

कारण

मला देव शब्दातच दिसला...

साऱ्या जगाला मी पहात आले आहे

नतमस्तक होताना देवांसमोर

कधी कुणा सत्पुरुषासमोर

कधी कुणा दगडासमोर

ती उच्चत्वाची भावना मला

दिसली कुठेच मात्र नाही

जी पाहून माझा श्वास थबकला

कारण

मला देव शब्दांतच दिसला

निथळत्या भावनेच्या अंगाअंगावरून

माझ्या मनाच्या सरळ तारा जोडणारे

काही उडणारे अन काही दडणारे

काही मात्र सावली बनलेले अबोल

शब्द शब्द इतके सारे जमले आहेत

त्यांचाच एक शब्द बनला

कारण

मला देव शब्दांतच दिसला!!

सृजन

तू थांब जरासे मागे
उलगडून सांग या वाटा
स्पर्शूनशी जा चांदण्याने
संध्येच्या या सोनेरी लाटा

दे हात तुझा माथी
प्राक्तनाच्या पुसून रेघा
गुंफून तू ठेव अलगद
आपल्या प्रारब्धाचा जोडधागा

पाऊलखुणेच्या कडांना
नक्षी असो एक लाल
हाताच्या ठश्यातून उमटो
हळवासा एक ख्याल

दरवळो तुझा मोगरा
माझ्या चांदणराती
चाफ्यात पुन्हा फुलूदे
जुनीच नेणती नाती

अक्षरांत माझा पुन्हा एकदा
अर्थ तुझे तू भरावे
देहास पुरूनही माझ्या
प्राण तुझे जरासे उरावे

श्वासांच्या कठड्यावरती
रुलून उभा हुंकार
तुझ्या पदन्यासी उमटो
माझ्या हदयाचा झंकार

अनंत काळापुरती
आपण जोडलीत नाती
शब्दांत तरी मिसळत राहो
नवसृजनाची नवी माती..

उद्धार

काहीसा अडखळता विचार आहे
निसटते शब्द आहेत
निसरडी स्वप्नं आहेत
आज काही आहेत उद्या काही आहेत

नक्की तसं काहीच नाही
नावाचा विचार आहे
नावालाच आचार आहे
कसलासा संचार आहे

नियम तसे मुळीच नाहीत
पण बंधने काहीशी आहेत
कोरडी रुदने काहीशी आहेत
अस्फुट स्पंदने काहीशी आहेत..

मनोरे आहेत रचलेले येथे
पायाचा अजुन पत्ताच नाही
लेखण्यांचा गुत्ताच नाही
माझी भावनेवर सत्ताच नाही..

पापण्या जड झाल्यात आता
स्वप्नांची काही चाहूल नाही
चुकाही नाहीत अन भूल नही
मागे-पुढे पाऊल नाही

पेनाच्या हातात हात माझा आहे
शब्दांचा आतून काही मार नाही
लिहायला बसले पण हा व्यापार नाही
पण लिहिल्याविणा माझा उद्धार नाही......

अमिबा १

वरती आकाश आहे
पण ते अथांग नाही.
जिथे मी आहे तिथून त्याला सीमा दिसतात.

भोवताली विश्व आहे
पण त्यावर विश्वास नाही
उलटे विणलेलेही काही धागे असतात

मी लहानच आहे मोठी नाही
थोडीशीच खरी पण बाकी खोटी नाही
पण छोट्या आकारालाही काही फसतात

दुनिया माझी मोठी आहे
मी एका डबक्यात राहते
मोठे मोठे पायही याच्यात धसतात

डबक्याला माझ्या कडा आहेत
पण मला त्या दिसत नाहीत
इथले तरंगच मला लाटा भासतात

डबक्याच्या आकाशाला कडा
जगाची तटबंदी नाजूकशी
पण ब्रम्हांडाचा पत्ता ते पुसतात.

मी क्षुद्र तुच्छ नगण्य जीव
माझे विचारही तसे थांबलेले
पण कल्पना ताऱ्यांच्या आरपार घुसतात

मर्यादीत डबक्यातला मी अमीबा
की सुजाण जाणिवेचा माणूस
दुविधेच्या सळ्या ठाण मांडून बसतात

अमिबा २

माझे अवयव सारे आकारहीन
कोपरा तरीही एक आहे

सुळसुळ्या निसटत्या सीमारेखा...
चिकट चिवट अंतरंग..
डोळ्याला न दिसणारे अस्तित्व
आणि जातीची भूक भूक भूक..
या व्याख्येतही गोम तरीही एक आहे

किरकिरता डोक्यातला भुंगा
हताश हातापायांना येणाऱ्या मुंग्या
कणा नाही की पाठ नाही
आधाराची काठीही ताठ नाही
डबक्याच्या राज्याला मी वाली तरीही एक आहे

वल्गना मोठ्या मोठ्या पाहून घ्याव्यात
डबक्यावर मनोरे बांधतोच आहे
निसटत्या निसरड्या हातांनी या
लाखो स्वप्नांसाठी रांधतोच आहे
काहीही जवळ नाही उड्या तरीही अनेक आहेत

राजा इथला तो कोण कुठला?
डबके सारे मीच जिंकेन
डबक्याचा होईन सम्राट मी
माझीच सत्ता सर्वत्र फेकेन
मनसुबे जमून आले ...खोट तरीही एक आहे.

एक पाऊल डबक्यात पडावे
काही तरंग -लाटा दिसावे
उद्ध्वस्त जेव्हा सारी स्वप्ने
अहं सोडून धूम पळावे
ही खरी कथा झाली गालबोट तरीही एक आहे

अमिबा ३

सरपटत जात उद्याकडे
आज काहीसा हरवतो आहे
धरलेल्या घट्ट आशा काही
बळी देण्या मागतो आहे

मी काय आहे मी कुठून आलो
काय माझे अस्तित्व आहे
ध्यानी नाही मनी नाही
नशीब माझे ध्यानस्थ आहे

विचारांच्या निखाऱ्यांना
जीवाचीही चाड नाही
आकाश धुरकटणारी
नजर आग पाही

लपेटून ठेवलेले पोतडीत
असलेच विचार आहेत
स्वप्नांच्या रंगपंचमीत
कोळसे अन अंगार आहेत

पाण्यात जरी रहात असलो
मी भलताच जहाल आहे
माझ्याही मनाला पण
ओल काहीशी बहाल आहे

चीड आहे संताप आहे
असहाय्य माझी तगमग
कठीण राठ कातडीमागे
धमनीत मायेची लगबग

स्वतःला शोधायला निघालॊ
मलाही एकाचा शोध आहे
रक्तातल्या लपल्या प्रेमाचा
नकळत ज्याला बोध आहे

ती दुसरी पेशी मिळेल जेव्हा
जिच्याशी अनामिक बंध आहे
तेव्हाच हाही पूर्ण होईल
अमिबाचा जो निबंध आहे

परमेश्वरा!

तांबड्या पहाटेत हरवलेली
आणि तेजात कुठेतरी लुप्त झालेली
माझी अस्फुट संवेदना
माझ्या आत्म्याशी जोड जरा
माझंच माझ्याशी जुंपलेलं
अविरत द्वंद्व तू तोड जरा

दिपून गेलेत माझे डोळे
एकाच क्षणाच्या झलकीत
जेव्हा मी डोकावून पाहिलं
माझ्या अस्तित्वाला एकदा
आणि झोकून दिलं आवेगानं
त्या सर्वस्वामध्ये एकदा..

माझ्यासमोर पसरलाय सागर
अथांग नि आभाळभर!
आणि ही पहाट अशी तेजस्वी
ओरबडून काढली आहेत तिने
माझ्या आत्म्याची जळमटं
आणि उरलेत तांबूस ओरखडे

स्वतःला ओळखू शकत नाहीये
म्हणूनच तू ये पुन्हा.
आणि पुन्हा कर माझी व्याख्या
तुझा हात माझ्या कपाळावर असेल
तरच माझ्या दिपल्या डोळ्यंना दिसेल
आणि मगच माझा विश्वास बसेल.

की
तू आणि मी एकच आहोत!
परमेश्वरा!!

आभास

आयुष्य म्हणले मी तुला
श्वास होऊन गेलास तू
स्पर्शातली अंतरे पुन्हा
घात पुन्हा केलास तू

संध्यारंग निळा जांभळा
स्वप्न माझ्या डोळ्यातले
ओंजळीला भर जशी
श्वेत ते काळ्यातले

पाऊल ठेवता भुईवरी
आभाळ आक्रंदले जसे
स्वप्न माझ्या रंगातले
कोरे कफन जैसे दिसे

ही ओढ अनावर आजही
हातास तुझिया शोधते
नजर रिकामी जीव रिकामा
अनंत शब्द संबोधते

शब्दांतुनी डोकावता तू
का शहारा अंगावरी
आयुष्य माझे तू श्वास माझे
तरी भितिची शिरशिरी

हे ज्ञान अनावर जाहले अता
प्रेत म्हणून म्हणून पुरले तुला
हा भास तुझिया भुताचा बस्स
हे एवढेच उरले मला...

वेदना

प्रेम प्रेम म्हणता म्हणता

एक श्वास होऊन जातं जगणं

शब्द लाचार होऊन जातात

उरतात त्या संवेदना

मनावर शरिरावर

अधिराज्य गाजवणाऱ्या

संवेदना

वाऱ्याची झुळुक

अलवार धून

आणि काव्यात वर्णलेले काहीबाही

अगदिच निरर्थक वाटायला लागेल

त्या गोड वेदनेपुढे

अंतरातून उठलेल्या

आरपार गेलेल्या

वेदना

झुकलेल्या पापण्यांमागे

गच्च धरलेल्या हातात

आणि फक्त साथीत..

तुझ्या नि माझ्या या मातीत
मिसळतील काही प्रार्थना
ईश्वराशी जोडणाऱ्या
सर्वस्व मोडणाऱ्या
प्रार्थना!

विरघळताना तुझ्यात
विसरताना अस्तित्व माझे
थेंब थेंब होऊन जाईन मी
झिरपून जाईन सर्वार्थाने
मागे उरेल ही भावना
माझ्या अंबराची
तुझ्या धरेशी नाती
भावना...

थबकू नकोस...

पाऊल उचललंस ना एकदा..

मागे का मग घेतोस? का वळून बघतोस?

पुढे गेलास ना एकदा?

म्हणतोस की आयुष्याची संध्याकाळ आत्ताच झाल्यासारखं वाटतंय

पण अरे याच्याकडे असं बघ..

बालकवींना संध्यारजनी सुचली

इतकं सौंदर्य संध्येत दडलेलं असतं

संध्याकाळचं ऊन पीऊन घे

साठव ही ऊब जीवात

विश्वास ठेव माझ्यावर..

हीच ऊब सारी रात्रभर तुला पुरेल...

मागं कधीतरी एका अशाच चांदण्या रात्रीत

मला तूच म्हणाला होतास

मी तुझी शक्ती आहे म्हणून..

मी तर अजून इथेच आहे..

मग शक्तीपात झाल्यासारखा हार कसा मानतोस तू?

ऊठ..मान ताठ ठेव !

परीक्षा आहे ही

फक्त तुझीच नाही..माझ्या प्रेमाची अन तुझ्या या शक्तीचीही ..

कारणमिमांसा करत बसेल ते सारं जग

माझं करण ही तूच आणि कारण ही..

नात्याची ही निरगाठ तोडायच्या फंदात पडू नको

तुझ्यासाठी मीच ती अलगद सोडवून घेते आहे

मीही जरा पुढे सरकते आहे

अन लक्षात ठेव!

मी तोवरच आहे जोवर तू आहेस...

मग तू माझा नसलास जरी..

मी तुझीच आहे

पुढे जा!! सोड माझी चिंता

मी पुढेच सरकेन हा विश्वास ठेव

मी वचन दिलं आहे

ज्या वाटेवरून तू जाशील ..

वाट तीच माझी

तू पुढे तर मीही पुढेच!

योगीराज

एकतारी त्याच्या हातची गेली
डोळ्यांमध्ये तरी लाखो आशा
भगवी कफनी नसली तरी
पाउले चालती दाही दिशा

निरंजनाचा जयघोष विरून गेला
आत्मा मात्र ब्रम्हांड धुंडाळतोय..
नव्या नव्या सुटबुटात बसून
तो वेग़ळेच विचार खंगाळतोय..

चेहरा तसाच तेजोमय
तीच चमक डोळ्यात आहे
रुद्राक्षाच्या माळेऐवजी आज
सोन्याची साखळी गळ्यात आहे

त्यागी असण्यासाठी आज
कफनी गुंडाळावी लागत नाही
खऱ्या योग्याला स्वतःची आज
पूजा मांडावी वाटत नाही..

विरक्ती त्याच्या मनाची असताना
भौतिक सुखे त्याने का सोडावीत?
अन विरक्त जो खराच असेल
शोभा त्याने का मांडावी?

पालवीचा जीव

पूर्णचंद्राच्या सावलीमध्ये ग़ंभीर
एक सूर्य तळपतो आहे..
त्याच्या तेजामध्ये हलकासा
दवबिंदू झळकतो आहे..

वडवानलाच्या तांडवात उग्र
अमृताचा लहानसा घडा...
लाल तापलेल्या फरशीवरती
प्राजक्ताचा मोहक सडा...

आभाळ फुटून बरसत असताना
माळरानवर वडाचं झाड..
विजा कोसळल्या वरून तरी
सावलीमध्ये पालवीची वाढ..

परिस्थितीचा वडवानल मोठा
वादळे विजांची आणतो.
तू असतोस ना सोबत जेव्हा.....
माझा पालवीचा जीव,
प्राजक्ताने पूजा दवाची मांडतो.......

चार ओळींचा इतिहास

क्षणभर आज विसावा शब्दांनी घेतला
तर कल्लोळ भावनांनी मांडला आहे
प्रत्येकच कवितेमागे आजवर माझ्या
चार ओळींचा इतिहास सांडला आहे...

सरत्या सेकंदाला बांधलेल्या खुणा
येत्या काळातून येती स्वप्नं
आज आत्ताचा थोडा आक्रोश
सगळं सगळं एकत्र होऊन शब्दात बरसतं

थरथरत्या जमिनीवर उभारल्या भिंती
पाताळधुंडी विचार माझे गेलेले
आकाशाला वश कधीच मी केले
अन शब्दांना वश मी झालेले

मी काय काल होते न जाणो
आजचा थोडा पत्ता मला ठाऊक आहे
उद्याची चिंता मी कधी केलीच नाही
चर्रर्र तरीही एक ओरखडा उठतो...

काळजावर ओरखड्यांची नक्षी बनली जेव्हा
कवितेला वाहवा तेव्हाच कशी मिळाली?
प्रशंसेवर हळूच हसताना मग तरी
शब्दांची पालवी कशी जळाली??

काय आहे काय नाही काय असो..
संभ्रम हेच माझं वास्तव असावं
म्हणूनच मला दिवसा स्वप्नं पडतात
अन रात्री मी उजेड पाडते..

शब्दही सार्थ अन एकसंध राहीले नाहीत
या सख्याची साथही सुटणारशी दिसतेय
काहीतरी होतंय मला खास!!!!

शब्द

शब्द माझा श्वास
शब्दात तो आभास
शब्दांत बांधलेला तू
शब्द देई विश्वास

शब्द थोडे मागणे
शब्द काही ओथंब
शब्द अंतातले
शब्द मग आरंभ

शब्द स्पर्शभाषा
शब्दातली उषा
शब्द भाळावरी
शब्द वेली अशा

शब्द देवत्व हे
शब्द जे पांडित्य
शब्द भांबावलेले
शब्द ते लालित्य

शब्द आठवण तुझी
शब्द हे साद
शब्द मांडून घे
शब्द दे प्रतिसाद!

नाते

अंधारल्या माझ्या काळजाला
ओलेत्या पणतिची साथ दे
उत्तरणाऱ्या उत्तररात्रीच्या संगे
उषःकाळाचाही हात दे

ओणवून दे कळ्या तो
प्राजक्ताच्या ओंजळीत जरा
माझा श्वास येथेच रे
या पाऊलीच असलेला बरा

दे एक मोती मलाही
मातीत तुझ्या सामावलेला
गंध माझाही असू दे
त्यातच जरा भांबावलेला

होऊदे मला एक थेंब
सरकणारा त्या पानावरून
ओवाळून टाकूदे जीव माझा
तुझ्या हरपल्या भानावरून..

दे एक अबोल तृप्ती मला
बोलक्या तुझ्या स्पर्शातली
घाल गाठ एक आज
बांध सृष्टी निमिषातली

उचल हळुवार श्वास माझा
प्राजक्त पावलावरून
चैतन्य दे या चेतनेस
उराशी एकदा धरून..

निरोप

हात बांधलाय माझा

जुन्या संस्काराच्या धाकानं

चुकुन ओलांडलेल्या मापानं

आणि जन्माच्या या शापानं...

जीव जडला तुझ्यात जरी

थांबावंच लागतं मला इथे

कुंपणांची फक्त गुंफण जिथे

अनाम ओढीलाही रोक तिथे..

आसुसलेली आहे मी कधीची

तुझ्या एका रे नजरेसाठी

तुझ्या सुरांच्या सरगमपाठी

बांधून कोवळ्या या निरगाठी

रुक्मिणीचा मान नको मला जरी

तुझी ओली फक्त हाक दे

तुझ्या हुंकाराचा श्वास दे

धगधगत्या धुनीची राख दे

हवंय फक्त चिरंतन स्थान

तुझ्या माझ्या या अबोल चालीला

दोघांना लपेटलेल्या या वेलीला
आत्म्याच्या आत्म्याशी बोलीला

विस्कटलेल्या स्वप्नांची साथ असो
पायाशी उंबरठा हा बांधलेला
आसवात जो घास मी रांधलेला
सुटत नाही हा कोपरा सांधलेला

पण तू असा सोडूनही जाऊ नकोस
एकदा माझ्याकडे बघ जरा
जवळ येऊन स्पर्श दे जरा
आसवांना लाव अलगद उरा

तिथेच होईल धन्य माझं अस्तित्व
तुझ्या स्पर्शाच्या संवेदनेत
अनाम नात्याच्या या कल्पनेत
राधेच्या या चिरंतन वेदनेत...

भाषांतरे

आर्त उडते प्राण माझे, थांबलेल्या साजातले..

साद घालाती सूरही गुंजत्या आवाजातले..

नभ मांडून बैसलेली कणांतली जन्मांतरे

ऊर सांडून थबकलेली अजाण मौनी भाषांतरे

शोध आहे आस आहे अस्तित्व जेथे गुंफले

ईश्वराचचे आशीषही हळूवार त्यात फुंकले

उभारले मी आर्जवाने नीर माझे महानसे

एक बिंदू तृप्त झाला राहिली मग तहानसे

झळाळला तो एक अश्म पैलू जसे पाडता

झळाळले आसमंत त्याने एक स्पर्श धाडता

अंतरातले सामर्थ्यही मग घेई झेप त्या खगाची

भाषांतरे मी वाहिलीही वाचलेल्या त्या नभाची…

शोध

मी तुझ्या स्वप्नातली राणी,
मी तुझी पंखुडी, परी आहे..
मी तुझा निरंतर ध्यास,
मी तुझी दुनिया सारी आहे..

मी अजबगजब रसायन,
मी रेशमाची श्रृंखला आहे..
मी वाळूचा प्रत्येक कण,
मी मोती लपवणारा शिंपला आहे...

मी कातरवेळचा उसासा,
मी पहाटेची भूपाळी आहे..
मी हरवलेले प्रेम सुद्धा,
मी मांगल्य कपाळी आहे...

मी आदी आहे तो परमात्मा,
मी रुद्राच्या धूनिचा अंत आहे,
मी आहे सर्वस्व विश्वाचे,
पण मजला तुझीच भ्रांत आहे.

धुळवड

शब्द फुटू नयेत इतका

कल्लोळ माजलेला कणाकणात

कुणीतरी साठवून साठवून उधळले

प्रेमाचे काही रंग

विरहाचे काही ढंग

अन शेवटी उरलेल्या राखेची धुळवड............

भिंतीवर लावलेलं कॅलेंडर असावं जसं,

आशाळभूताला सणाचं लालूच दाखवत लटकलेलं

नियतीची पापणी लवावी

अन यावा वाऱ्याचा झोत एक असा

फडफड फडफड पानं उडावी

आणि आशांची भुतं फक्त उरावीत....

एक रोपटं लावलं ओल्या मातीत

अन त्याखाली होता भेगाळला पाषाण

ओलावा भेगेत झिरपत राहीला..सतत ..

दगडाची भेगही बदलली नाही

रोपट्याचं खुंट झालेलं तेवढं दिसलं

अन उरली ओल्या मातीची धूळ.....

यमकात बांधू पाहता शब्दांना

धरबंध मग कसलाच उरत नाही

कुरबुरत राहिलेली मनातली भिती

एकदम अक्राळविक्राळ हल्ला बोलते

वाक्यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात

अन मी धुंडाळत राहते नुस्ती..

राखेत हरवलेली काही जुनी अक्षरं..

संकल्प

पाऊलवाटेवर निसटून पडलेले
कण काही वेचते आहे
स्वप्नांच्या धाग्यावर निरगाठी
काही उगाच खेचते आहे

तृप्त मनालाही कधीची
हुरहुरशी जरी लागलेली आहे
सांधून ठेवल्या तुकड्यांना तरी
पूर्णता अचानक लाभलेली आहे

हलक्या हाताने टिपत जात
पापणीमागचे दवबिंदू नि वारे
मागच्या मागेच पसरलेले राहिले
मागच्या काळाचे जुने हाकारे

वाळूचं पाउल टाकते वळीव पावसात
अंकुर-साम्राज्य तारण अन घेऊन कर्जाऊ नशीब
खारट घामेजल्या जमिनीच्या बळावर
उद्यापासून लावीन सुखाचा रतीब

जुन्या प्रत्येक हारीत ओवून
नवा संकल्प अलवार बांधते
पूर्णत्वाच्या कोरड्या सुरकुत्या
निश्चयाच्या गिलाव्याने सांधते

ही एक प्रोसेस आहे

रोज सकाळी डोळे उघडल्यावर
सर्वप्रथम करत "नॉक नॉक"
स्माईल देणारा तुझा विचार
हाताच्या फटक्या सरशी बाजूला सारून
पांघरूणातून बाहेर निघणं
ही एक प्रोसेस आहे

रिकाम्या घरातल्या भकास बाथरूमात
थंड पाण्याच्या शॉवरखाली उभ्याने
केसांखालच्या मेंदूतून तुझा ओला चेहरा
कोरड्या टॉवेलने खसखस पुसून
टॉवेल झटकत वाळत टाकणं
ही एक प्रोसेस आहे

युनिफ़ॉर्म चढवून, बाह्या मागे वळवून
रोजची ती एक वही उचलत

कालच रात्री नकळत तुझं एक चित्र काढलं

ते मागचं पान फाडणं....चुरगाळणं ....

आणि फेकून ताठ मानेनं कॉलेजात जाणं

ही एक प्रोसेस आहे

कॅन्टीनच्या घोळात दोस्तांच्या सोबत

कटींगचा घोट घेत घेत..घेत घेत ..

कॅन्टीनचा खास कोपरा आहे "आपला"

पळत तिथून सुसाट निघावं वाटतं

तरीही ...मुद्दाम .... थेच एकटं जाऊन बसणंति

ही एक प्रोसेस आहे

रोजची "इव्हिनींग" घ्यायला कोपऱ्यावर जाणं

तर सुसाट वेगानं गाडी घेताना

सुसाट उडणाऱ्या तुझ्या केसांची आठवण

"इव्हिनींग"च्या धुरात धुरकट करणं

आणि मग फुंकर मारून उडवून लावणं

ही एक प्रोसेस आहे

अंधारात अंधारकाळ्या डोळ्यांच्या फॅन्टसी

स्पर्शास्पर्शातून झिरपणारी एक्स्टसी

प्रेमाच्या काही मूमेंट्सचं मॉन्यूमेंटल मॅजिक....

आणि परत अंथरुणावर "सिस्टीम कन्सीडरींग लॉजिक" !!

लॉजिकली या सगळ्यांना काढून फेकणं

ही एक प्रोसेस आहे.

सालं सगळं आयुष्य फ्लोचार्ट बनलंय

भावना साल्या मधे अडकल्यात "डिसिजन बॉक्स"

पण जरा समजून घे गं बाई..

ही एक प्रोसेस आहे

प्रोसेस चालू आहे

प्रोसेस माझी चालूच आहे.

कृष्णसावली

मी श्वास श्वासातुनी
आवर्तने केली जयाची
तो माधवही आता
रुसून बसला आहे

त्रास त्रासातुनी त्याला
जाणिले कणाकणाने
आत्माच त्यात माझा
रुतून बसला आहे

बासरीच्या सुरांनी
वेड लावताच मजला
केले यथार्थ सारे
आयुष्य कंठलेले

त्या सावळ्या रुपाला
ती सावळीच दृष्ट
दिले सावळेच सौख्य
सोन्यात गंठलेले

भक्ती नव्हे ही माझी

आशीश त्याचाच आहे

सावरले बंध सारे

विखुरले विखुरले

त्याच्याच सुरावटींनी

राग बांधलाय माझा

अस्तित्व त्यात माझे

हरपले हरपले

तो कृष्ण नाही मजला

तो शब्द माझाच आहे

विश्वात भाव त्याचे

पसरले पसरले

मलाच त्यात मीही

विसरले विसरले

हे स्वप्न नाही! सत्य आहे!!

स्वप्न तर मी पण पाहिलं होतं....
एका सुंदर धुंद रात्री,
फुलांच्या मदहोश शय्येवरती,
नव्या को-या साडीतली,
लाजलेली मी, मिटलेले माझे डोळे,

तुझ्या स्पर्शाच्या आशेत पहुडलेली...
माझा शांत चेहरा झाकणारं
कोरं अवगुंठन उचलून
अर्धवट खुल्या माझ्या ओठांना
निसटता स्पर्श करणारा अन्,
तुझ्यासाठीच चालणाऱ्या माझ्या
हृदयावर डोकं विसावणारा तू....

स्वप्नात आपण दोघं होतो
की एकच होतो आपण??
तसंच काहिसं आहे आत्ता ना..
बघ.. दिसतंय? कळतय तुला??
स्वप्न माझं खरं झालय....

फुलांच्या शय्येवरती डोळे मिटून

शांत पहूडलेय मी .. कोऱ्या कपड्यात ...

अर्धवट खुल्या माझ्या ओठांवरती,

गंगाज़लाचे थेंब निसटता स्पर्श करतात..

आताही माझ्या हृदयावरती तुझं डोकं आहे,

आताही तुझे हात मला जागवण्याचा प्रयत्न करतात..

स्फुंदून स्फुंदून रडू नकोस रे असा..

जशी मी रडले होते तेव्हा, जेव्हा,

तू झिडकारलंस माझं प्रेम..

जेव्हा तूच नाही म्हणालास, मग,

स्वप्न बघाण्याचा अधिकार कुठे उरला??

हृदय थबकलं..त्याला देखिल जाणीव झाली ..

हे स्वप्न नाही...!! सत्य आहे....!!

तो आणि राणी

कुंचला एक स्वप्नांचा
सत्यावरती फिरवणारा तो...
जादूची कांडी परीची ती..
उचलून मला मंतरणारा तो...

जळणाया आगीतून उठणारी-
एक छोटिशी प्रिया..
ओंजळीत जपून ठेवलेली
कोणे काळची क्रिया...

भेदक नजर करारी अदा
डोळ्याच्या गर्भात तरिही मोती..
तिच्या नजरेत हतबल होणारा
राजबिंडा तिचा साथी...

कृष्ण आणि राधेची कथा
माग़े पाडणारी कहाणी..
ओठांवरती सोन्याची लकेर
आणणारा तो अन् त्याची वेडी राणी...

आपण

अतर्क्य उत्तरांमागे लपलेली

एक ओली पुसट रेषा..

तुझ्या नि माझ्या प्राक्तनांना जोडणारी..

जरा थबकणारी सुद्धा

जरा जरा उमलणारी..

थोडी खट्याळ.

चोरटं पाऊल वर्तुळाबाहेर टाकणारी

खुदकन हसणारी

तुला नि मला… “आपण” बनवणारी..

एक ओली पाऊलखूण..

जन्मांतरीच्या अनाम नात्याची

हलकासा ठसा पाडत जाते

मला हलकंच ताडत जाते

तुला मला ओढत जाते

एका क्षितिजाकडे

एका सूर्योदयाकडे

एका चंद्रास्ताकडे..

एक ओली कुजबुज..

आत्म्याचं आत्म्याशी सरळ गूज

जमत्या न जमत्या विचाराचं

एका कल्पनेचं नि मग तिच्या संचाराचं

नकळत सांधल्या उच्चाराचं

उद्धाराचं दोन जीवांच्या

नि दोन आत्म्यांच्या

एकमेकांतल्या... विसावलेल्या...

वर्तमान आचाराचं..

एक ओलं पान इथेही

थांबलेलं जरा संभ्रमात

पण आतून ताठ आत्मविश्वासानं

साथ देण्याच्या वेड्या ध्यासानं

वेडावलेलं दुसऱ्याच्या सहवासानं

पण बांधलेलं जे श्वासानं

फुलापाड जपलेलं आहे

एक पान..

सोनेरी वहीतलं माझ्या

आणि त्यासोबतच सगळी ओल..

तुझी... माझी... आपली....

चौकटीतल्या भराऱ्या

एक रेघ आखली..

आणि मग तिला दिला एका कोपऱ्यावर काटकोनाचा फाटा.

करकरीत कोऱ्या कागदावर जाता जाता

परत काटकोनी वळल्या वाटा..

सफर झाली सुरू..

आकाश अथांग पसरलेले...

ओढ तरीही आतली

जीवन उगमापाशीच उतरलेले..

काटकोनाचा सर्रकन घेतला एक धावा..

उगमापाशीच येऊन पोहोचले

निर्मिल्या चौकटीचा एक बिंदू

अन बिंदूवर माझ्या भरारीचा पाया....

भरारीची योजना आखायला बसले

पहिला पाया पंखांना बळ..

आकाशाच्या सीमा ठरवून ठेवल्यात

आता उचलायचेत बस पंख..

अन उडायचंय सरळ रेघेत उंच...

माझ्या चौकटीच्या सीमा

माझ्या अस्तित्वाच्या भिंती बनून उभ्या राहतील..

सदैव तत्पर..आधारालाही अन निवाऱ्यालाही ..

चौकट तेवढी ठेवली आहे..

तिच्यावर छत मुद्दामच नाही घातलं...

छत आता आकाशाच्या पार न्यायचं आहे...

भरारीला तेवढं उंच..

चौकटीतच बनवायचं आहे.....

ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडॆतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत . महाराष्ट्राच्या जवळपास प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांत ई साहित्य चे वाचक आहेत. याशिवाय दरवर्षी सुमारे तीस ते चाळीस लाख वाचक ई साहित्यच्या वेब्साईटला भेट देऊन पुस्तके डाऊन लोड करतात. पण याने आमचे समाधान नाही. जोवर महाराष्ट्रातील प्रत्येक साक्षर हा वाचक होत नाही तोवर ही चळवळ चालेल. आमचे लक्ष्य सहा कोटींचे आहे. आमच्या पाठीशी माऊलींचा आशिर्वाद आहे. “ ईये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी” ही त्यांची प्रार्थना आपणा सर्वांकरवी सुफ़ळ संपूर्ण व्हावी.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण

तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!